**रे.के.नं. १८/२००७**
**नि.क्र. ५१/क**

अभियोगपक्षातर्फे **साक्षीदार क्र.८** याची जबानी
मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,

माझे नाव - **रविंद्र रंगनाथ दौंडकर**

वय - ५४ वर्षे

व्यवसाय - सहा पोलिस आयुक्त

राहणार - गुन्हे शाखा ठाणे शहर

**सरतपासणी अभियोगपक्षातर्फे सहा. सरकारी अभियोक्ता श्री. शितल पवार यांच्यामार्फत...**

१. मी घटनेच्यावेळी न्हावाशेवा पोलिस ठाण्यात पोलिस उपनिरीक्षक पदावर कार्यरत होतो. त्यावेळी पोलिस ठाणे अधिकारी म्हणून हेडकॉन्स्टेबल श्री चव्हाण ब.क्र. ३४५ हे होते. त्यांनी गुन्हा क्रमांक II ०७/२००४ इसेंशियल कमोडेट ॲक्टचे कलम ३ व ७ अंतर्गत नोंद करून घेतला होता. त्याचा पुढील तपास माझ्याकडे सोपवण्यात आला होता. तपासकामी माझ्याकडे फिर्याद, माल जप्तीचा पंचनामा व आरोपी अहमद याचा जबाब देण्यात आला होता. त्या कागदपत्रांचे मी अवलोकन केले असता असे आढळून आले की, तत्कालीन तहसिलदार उरण सुप्रिया करमरकर यांना माहिती मिळाली होती की, जे.एन.पी.टी पीयुबी समोर ऐश्वर्या पार्कींग परीसरात अवैध तेलाचा व्यवसाय चालतो. त्याअनुषंगाने त्यांनी तेथे रात्री आठ वाजताच्या सुमारास पंच व स्टाफसह जाउन पाहणी केली असता त्यांना तेथे नाल्यामध्ये भरलेले लोखंडी ड्रम व पांढ-या रंगाचे प्लॅस्टिक कॅन मिळून आले. तसेच त्यांना तेथे अन्नि  अहमद नावाचा इसम सुध्दा मिळून आला. तेथे मिळून आलेल्या एकूण सात लोखंडी ड्रम मध्ये पिवळसर रंगाचे सोयाबीन सदृश्य तेल असे एकूण १०७० लीटर तेल मिळून आले. त्याची किंमत अंदाजे १६०५०/- रूपये होती. तसेच तेथे मिळून आलेल्या आणखी एका ड्रममध्ये काळसर रंगाचे केरोसिन होते ते त्यांनी त्याच्या वासावरून ओळखले ते १६० लीटर होते. तसेच तेथे त्यांना तेथे मिळून

आलेल्या तीन नग पांढ-या रंगाच्या प्लॅस्टिक कॅनमध्ये एकूण १०० लीटर पांढ-या रंगाचे केरोसिन मिळून आले. त्याची अंदाजे किंमत ५२०० रूपये होती. अश्या प्रकारे त्यांनी एकूण २१२५० रूपयाचा मुद्देमाल जप्त केला होता. तहसिलदार यांनी त्या व्यक्तीकडे ते तेल बाळगण्याचा परवाना विचारला असता त्याचेकडे परवाना नसल्याचे सांगितले. तसेच तहसिलदार यांनी तो व्यवसाय कोणाच्या मालकीचा आहे असे विचारले असता तो जयंतीभाई याचे मालकीचा असल्याचे त्याने सांगितले होते. त्यांनी तो मुद्देमाल पंचनामा करून ताब्यात घेउन पोलिस ठाण्यात आणून जमा केला असता मी त्याची मुद्देमाल पावती फाडली. ती मुद्देमाल पावती ५ क्रमांकावर आहे. आता मला ती मुद्देमाल पावती दाखवली त्यावर माझी सही असून तो मजकूर खरा व बरोबर आहे. करिता सदर मुद्देमाल पावतीस **निशाणी क्रमांक ५२/क** देण्यात येतो. त्यानंतर मी आरोपी अन्नी अहमद याला अटक केले. त्यानंतर मी तपासणी पथकात असलेल्या तीन साक्षीदारांचे जबाब नोंदवले. त्यानंतर मी जिल्हा पुरवठा अधिकारी तहसिलदार यांनी पाठवलेल्या अहवालाची प्रत प्रकरणात दाखल करून घेतली. आता मला प्रकरणात दाखल सदर अहवालाची सत्यप्रत दाखवली. त्यावर तहसिलदार यांची सही व शिक्का आहे. सदर दस्त हा कायदेशीर तरतुदीनुसार सिध्द करण्याचे अधिन राहून त्यास ओळखीसाठी **निशाणी क्रमांक ५३/क** देण्यात येते. त्यानंतर मी आरोपी जयंतीलाला ठाकूर याला सुध्दा अटक केले. नमुना म्हणून घेतलेला मुद्देमाल तहसिलदार यांनी त्यांच्याकडेच ठेउन घेउन तपासणीसाठी पाठवण्याची जबाबदारी त्यांनीच घेतलेली होती. तहसिलदार उरण यांनी एकूण ११ नमुने घेतले होते. त्यातील ८ ते ११ नमूने हे करोसिनचे असल्याने हिंदूस्थान पेट्रोलियम यांनी ते स्विकारले परंतू नमुना क्रमांक १ ते ७ हे सोयाबीन तेलाचे असल्याने त्या कंपनीने ते न स्विकारता परत केल्याने ते नमुने तहसिलदार उरण यांनी एफ.एस.एल कलिना मुंबई येथे पाठवले. हिंदुस्थान पेट्रोलियम कंपनीने १ ते ७ हे नमुने परत केल्याबाबतचे पत्र प्रकरणात दाखल आहे. आता मला प्रकरणात दाखल त्या पत्राची सत्यप्रत दाखवली. त्यावर तहसिलदार उरण यांची सही

व शिक्का आहे. सदर दस्त कायदेशीर तरतुदीप्रमाणे सिध्द करण्याचे अधीन राहून ओळखीसाठी त्यास **निशाणी क्रमांक ५४/ क** देण्यात येते. तसेच हिंदूस्थान पेट्रोलियम कंपनीने चार नमुने स्विकारल्याबाबत पत्राची प्रत प्रकरणात दाखल आहे. आता मला प्रकरणात दाखल ते पत्र दाखवले. त्यावर तहसिलदार उरण यांची सही व शिक्का आहे. सदर दस्त कायदेशीर तरतुदीप्रमाणे सिध्द करण्याचे अधीन राहून त्यास ओळखीसाठी **निशाणी क्रमांक ५५/क** देण्यात येते. तसेच १ ते ७ क्रमांकाचे नमुने एफ.एस.एल यांना पाठवल्याबाबत पत्राची प्रत प्रकरणात दाखल आहे. त्यानंतर तपासणी अहवाल लवकरात लवकर प्राप्त होण्यासाठी तहसिलदार उरण यांचेकडे पत्रव्यवहार केला. त्याबाबतची स्मरणपत्रांच्या प्रती प्रकरणात दाखल असून त्यावर माझ्या सह्या आहेत व त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. सदर पत्र / स्मरणपत्राला अनुक्रमे **निशाणी क्रमांक ५६ ते ६४** देण्यात येते. त्यातील एक पत्र हे पोलिस उपायुक्त यांनी सुध्दा पाठवलेले आहे. मी दिलेल्या पत्र व स्मरणपत्रांमुळे तहसिलदार उरण यांनी देखील हिंदूस्थान पेट्रोलियम कंपनीकडे अहवाल मिळण्याकरिता पत्रव्यवहार केला होता. तसेच त्यांनी एफ.एस.एल यांचेकडेसुध्दा पत्रव्यवहार केला होता. त्यानंतर माझी बदली झाल्याने पुढील तपास पि.एस.आय जगताप यांचेकडे सोपवला आला होता.

**सरतपास संपला**

**सदर प्रकरण फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम २९९ अंतर्गत चालवण्यात येत असल्याने आरोपीतर्फे उलटतपास नाही.**

**फेरतपास नाही.**

सही/-

उरण,
दिनांक – ०७.०१.२०२६

**(एस. पी. वानखडे)**
न्यायदंडाधिकारी प्र. वर्ग, उरण